महाराष्ट्र जनशक्ती | ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ९६ वा | दिनांक : १०/०१/२०२५ | वार : शुक्रवार

## संविधान सन्मान दौड २०२५ ची नावनोंदणी सुरू : २५ जानेवारी रोजी होणार स्पर्धा




**पुणे** : भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षा निमित्त 'संविधान सन्मान दौड २०२५ ' चे आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिति पुणे यांच्या वतीने करण्यात आले आहे. येत्या २५ जानेवारी २०२५ रोजी ही स्पर्धा होणार असून स्पर्धकांची नावनोंदणी सुरू झाल्याची माहिती 'संविधान सन्मान दौड' चे मुख्य आयोजक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती, पुणेचे अध्यक्ष परशुराम वाडेकर आणि डॉ. विजय खरे ( विभाग प्रमुख : संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) यांनी दिली आहे.

'संविधान सन्मान दौड २०२५' ची माहिती देताना मुख्य आयोजक परशुराम वाडेकर म्हणाले, या स्पर्धेचे यंदा हे तिसरे वर्षे आहे, मागील वर्षी या स्पर्धेत तब्बल ५० देशांचे ५ हजारांहून अधिक स्पर्धक सहभागी झाले होते, यावर्षी ६ ते ७ हजार स्पर्धक सहभागी होतील असा अंदाज आहे, त्यादृष्टीने तयारी सुरू आहे. यंदाची स्पर्धा २५ जानेवारी रोजी पहाटे ५ वाजता खाशाबा जाधव क्रीडा संकुल, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथून सुरू होणार आहे.

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रवेश विनामूल्य असून नाव नोंदणी बंधनकारक आहे, २१ जानेवारी २०२५ ही नाव नोंदणीची शेवटची तारीख आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकास टी-शर्ट ,सर्टिफिकेट, मेडल, संविधानाची प्रत देण्यात येणार आहेत, तसेच विविध वयोगटातील पुरुष आणि महिला गटात पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकाच्या विजेत्यांना रोख बक्षिसे, स्मृती चिन्ह दिले जाणार आहे. अधिक माहितीसाठी ९८५०१११७१०, ९८२२४८३७१४, ९६५७०७५१२३, ९०२१८०८८९७ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन परशुराम वाडेकर, डॉ. विजय खरे यांनी केले आहे.

## विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आंदोलन



**धुळे** : मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत प्राथमिक व माध्यमिक शिक्षक तसेच राज्यातील सर्व प्रशिक्षणार्थी युवक, युवतींच्या मानधनात वाढ करावी, त्यांचा कार्यकाळ वाढवून द्यावा व त्यांच्यासाठी भरती प्रक्रियेत 10 टक्के जागा राखीव ठेवाव्यात अशी मागणी करण्यात आली आहे. याबाबत जिल्हाधिकारी यांना आदर्श मल्हार बहुजन सेनेच्या नेतृत्वात प्रशिक्षणार्थी युवक, युवतींकडून निवेदन देण्यात आले. त्यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर आंदोलनही करण्यात आले.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी सर्व आस्थापनावर ६ महिन्यांचे प्रशिक्षण घेत आहे. त्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांना कार्यकाळ वाढवून द्यावा, तसेच त्याच ठिकाणी कायमस्वरूपी नोकरी, रोजगार उपलब्ध करून द्यावा, त्यांची मुदतवाढीसाठी परिपत्रक काढावे, त्यांना किमान २५ ते ३० हजार रुपये वेतन, प्रशिक्षणानंतर सेवेत कायमस्वरूपी सेवेची संधी द्यावी, शासकीय, निमशासकीय कर्मचाऱ्यांना देय असलेल्या सर्व सवलती देण्यात याव्यात, भरती प्रक्रियेत प्रशिक्षणार्थींसाठी १० टक्के जागा राखीव ठेवाव्यात, मानधनात वार्षिक दहा टक्के वाढ करावी, विषय शिक्षकांप्रमाणेच डीएड, बीएड. वेतन श्रेणीचा लाभ द्यावा आदी मागण्या आहेत. याबाबतचे निवेदन मुख्यमंत्र्यांना देण्यात आले. याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर निदर्शनेही करण्यात आली.

# या षंढांच्या अन् गुंडांच्या कितीही टोळ्या आल्या तरी हा जरांगे आता मागे हटणार नाही : मनोज जरांगे पाटील

**पैठण** : संतोष देशमुख यांना न्याय मिळेपर्यंत या राज्यातील एकही व्यक्ती एक इंचही मागे हटणार नाही. आम्ही या प्रकरणी कुणालाही सोडणार नाही. विशेषतः परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणातील आरोपींनाही आम्ही सोडणार नाही. या दोन्ही प्रकरणातील एकही आरोपी सुटला तर सरकारची गाठ आमच्याशी आहे, असा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी गुरुवारी दिला. जरांगे यांनी यावेळी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर थेट हल्ला चढवत त्यांना आपल्या लाभार्थी गुंडांच्या टोळ्यांना थांबवण्याचाही सूचक इशारा दिला.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण येथे गुरुवारी संतोष देशमुख हत्याकांडाप्रकरणी मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना मनोज जरांगे यांनी राज्य सरकारला उपरोक्त इशारा देत मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. ते म्हणाले, धनंजय मुंडे यांनी जे प्रयोग सुरू केलेत. जे षडयंत्र सुरू केलेत. ते आता आपल्या समर्थकांना रास्ता रोको करण्याचे, मोर्चे काढण्याचे व आंदोलने काढण्यास सांगत आहेत. यामागे दुसरे कुणीही नाही. तेच आहेत. पण ते जास्त खोलात जात आहेत हे त्यांच्या लक्षात येत नाही. तुम्ही संतोष देशमुखांच्या पाठिशी उभे न राहता तुम्ही आरोपींच्या पाठिशी उभे राहण्याचे काम तुम्ही आपल्या लाभार्थी टोळीच्या माध्यमातून सुरू केले आणि तुमच्या कुटुंबातील कुणी गेले तर आम्ही ही असेच मोर्चे काढायचे का? असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला.

धनंजय मुंडे हा महाराष्ट्र नेमक्या बाजूने घेऊन जात आहेत? ते मंत्रिपदावर आहेत. संविधानाची शपथ घेऊन या राज्याचा एक प्रमुख व्यक्ती म्हणून तुम्ही काम करता. पण तुम्ही तुमच्या लाभार्थी गुंड टोळीला आमच्याविरोधात आंदोलन करण्यास सांगता. आरोपींना साथ देता. धनंजय मुंडे यांची ही चाललेली दिशा चांगली नाही. असेच सुरू राहिले तर यापुढे सर्वच जाती आपापल्या आरोपीच्या पाठीमागे उभे राहतील. धनंजय मुंडे आपल्या गुंड टोळीच्या मदतीने प्रथमच अशा गोष्टी करत आहेत. देशात पहिल्यांदाच असे होत आहे, असे मनोज जरांगे म्हणाले.

मनोज जरांगे यांनी यावेळी धनंजय मुंडे ओबीसींच्या मागे लपत असल्याचाही आरोप केला. ते म्हणाले, धनंजय मुंडे यांच्या लोकांनी धनंजय देशमुख यांना धमकी दिली. संतोष देशमुख यांच्या वेळेस अॅट्रोसिटी दाखल झाली असती तर देशमुखांची हत्या झाली नसती. आता त्यांचे बंधू धनंजय देशमुख यांना पोलिस ठाण्यात धमकी देण्यात आली. आम्ही कुठे चुकलो. आम्ही एखाद्या वंजाऱ्याला धमकी दिली का? दलित किंवा एखाद्या मुस्लिमाला धमकी दिली का? अरे धनंजय मुंडे आमच्या रक्तात नाही ते... आमचे रक्त पवित्र आहे. आम्ही आतापर्यंत एकाही जातीविरोधात भाष्य केले नाही. पण नेत्याला सोडत नाही. स्वतःचे पाप झाकण्यासाठी आता धनंजय मुंडे ओबीसीचा आसरा घेत आहेत. यांचा ओबीसींचा काय संबंध? खून करणारे तुम्ही. पाप करणार तुम्ही आणि त्यात ओबीसींना ओढणार, असे कसे चालणार... आम्ही कोणत्याही जातीला बोललो नाही व बोलणारही नाही. पण गुंडांना सोडणार नाही.

माझ्यावर कितीही गुन्हे दाखल झाले तरी हरकत नाही. मुख्यमंत्र्यांनी यापूर्वीच माझ्यावर एसआयटी लावली आहे. मी त्याला घाबरत नाही, मग या गुन्ह्यांना कसा घाबरेन? माझ्यावर १ हजार गुन्हे दाखल झाले तरी मी मागे हटणार नाही. गोरगरीब मराठ्यांना आरक्षणाच्या माध्यमातून न्याय देण्यासाठी माझ्याविरोधात या षंढांच्या व गुंडांच्या कितीही टोळ्या उभ्या राहिल्या तरी हा जरांगे मागे हटत नाही. धनंजय मुंडे यांनी जे करायचे ते करावे. मी अन्याय सहन करणार नाही. मी न्यायासाठी लढेन.

धनंजय मुंडे यांनी आपल्या लाभार्थी टोळ्यांना थांबवावे. तू खोलात जात आहेस. तू फसत चालला असून, फसणारच आहेस. आता तू मला खेटलास आहेत. आता मी पाहतो. तुझे परळीपासून मुंबईपर्यंत अनेक मॅटर आहेत. माझे २५ तारखेचे उपोषण होऊ दे. त्यानंतर तुम्हाला मनोज जरांगे काय ते दाखवून देतो. मी आतापर्यंत धनंजय मुंडे यांच्यासारख्या नासक्या लोकांचे नावही तोंडात घेतले नाही. आम्हाला ओरिजनल माणसांचे नाव घेतो. अशा माजुरड्यांचे नाव आम्ही घेत नाही. तुम्हाला वाटते तुम्ही लै आडमूठ आहात. पण मराठे नादाला लागले तर तुमच्याहून जास्त आडमूठे आहेत हे लक्षात घ्या. आम्हाला हे राज्य शांत ठेवायचे आहे. येथील कायदा सुव्यवस्था बिघडू द्यायची नाही म्हणून आम्ही शांत आहोत, असे जरांगे म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १० जानेवारी २०२५


## मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा जिल्हा छत्रपती संभाजीनगर शैक्षणिक सहलीचे आयोजन












**छत्रपती संभाजीनगर :** मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा जिल्हा छत्रपती संभाजीनगर या शाळेच्या खटोड फार्म कारकिन येथे शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. शालेय विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी सदर सहलीमध्ये आवडीने सहभाग घेतला.

या सहलीमध्ये विद्यार्थ्यांनी उंटाची सफर, रेन डान्स, कठपुतली डान्स, जादूचे खेळ, घोडेस्वारी, बलून डान्स, सि सॉ, घसरगुंडी जम्पिंग जपाक इत्यादी मनोरंजक खेळाबरोबरच बैलगाडी सफर, मडके बनवणे, चरख्यावर सूत कातणे, ट्रॅक्टरची सफर इत्यादी ग्रामीण जीवनावर आधारित बाबींचे प्रत्यक्ष अनुभव देण्यात आले. तेथे नाश्ता जेवण याची सोय करण्यात आली होती तसेच विद्यार्थ्यांना रानमेवा खाण्याचाही अनुभव मिळाला.

सदर सहल यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक प्रभाकर शिंदे त्यांनी नियोजन केले यांच्यासह सर्जेराव वाघ संदीप चव्हाण, अर्चना भारद्वाज बेबी राऊत मनीषा शिंदे विद्या ससावडे तसेच शाळेतील सेवक रवींद्र खापे यांनी उत्तम नियोजन करून परिश्रम घेतले.

या सहली प्रसंगी सर्व विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता तसेच नवीन शिकायला मिळाल्याबद्दल कुतूहल जागृत झाले. सदर सहलीबाबत पालकांनी समाधान व्यक्त केले

## अमोल कटके यांच्या वाढदिवसानिमित्त बेरडवाडी जिल्हा परिषद शाळेस पाच जार व खाऊचे वाटप



भुसणी, ता. उमरगा येथील जिल्हा परिषद प्रशालेत वाढदिवसाच्या निमित्ताने जार व खाऊचे वाटप करताना महेश मोटे, अनिल मुडमे, अमोल कटके व अन्य.

**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून होतकरू व गरीब विद्यार्थ्यांना काहीतरी दिले पाहिजे. या उदात्त हेतूने बेरडवाडी, ता. उमरगा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पत्रकार अमोल कटके यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पत्रकार दिनाच्या निमित्ताने जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांच्या पिण्याच्या पाण्याकरिता पाच हजार व खाऊचे वाटप बुधवारी (ता. ८) रोजी करण्यात आले. यावेळी डॉ. महेश मोटे यांच्या हस्ते प्रशालेचे मुख्याध्यापक अनिल मुडमे यांना ज्या सुपूर्द करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे होते. यावेळी महाराष्ट्र पत्रकार संघाचे पदाधिकारी मनोज हावळे, योगेश पांचाळ, नामदेव भोसले, प्रशालेचे मुख्याध्यापक अनिल मुडमे, सहशिक्षिका रंजना तांदळे, राधिका जमादार आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी महेश मोटे म्हणाले की, अलीकडच्या काळात वाढदिवसाची फॅशन झाली आहे.

अशा स्थितीमध्ये वाढदिवसाच्या निमित्ताने होणाऱ्या खर्चाला फाटा देऊन त्याच पैशाचा विनीयोग समाजकार्यासाठी करण्याची भावना ही खूप महत्त्वाची आहे. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक अनिल मुडमे यांनी केले. सूत्रसंचालन तंत्रस्नेही शिक्षक सुनिल राठोड तर आभार रंजना तांदळे यांनी मानले.






## सहकार महर्षी बाळासाहेब पवार वाचनालयात ग्रंथ प्रदर्शनाचे उदघाटन



**कन्नड (अरुण थोरात):** येथील सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय व बाळासाहेब पवार फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने,वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाअंतर्गत, मंगळवारी (ता. ०७)ग्रंथ प्रदर्शन आयोजीत करण्यात आले होते.उदघाटन समारंभाच्या अध्यक्षस्थनी साने गुरुजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ मिलींद पाटील हे होते तर सेवानिवृत्त मुख्याध्यापक व साने गुरुजी शिक्षण संस्थेचे सचिव टी.एस. कदम यांच्या हस्ते या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.

या वेळी बोलताना टी एस कदम म्हणाले की, " विद्यार्थ्यांनी शालेय व महाविद्यालयीन जीवनात वाचन करायला हवे. माणसे वाचनातून मोठी होतात. वाचनातूनच मुलांचे व्यक्तिमत्त्व घडते. काही मुले शाळेनंतर शिकवणी वर्गाला नियमित जातात. त्या प्रमाणे मुलांनी दररोज वाचनालयात येऊन पुस्तक वाचायला हवीत" कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. मिलींद पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालयाच्या विविध वाचन उपक्रमांचे कौतुक केले.

यावेळी व्याख्याते प्रा. रंगनाथ लहाने यांनी मनोगत व्यक्त केले.या ग्रंथ प्रदर्शन सोहळ्यास मुख्याध्यापक भगवान ठाकरे , संजय जाधव, वाचनालयाचे सचिव आर.के.पवार, अहिराव सर,नरेश सोनवणे, ऋषिकेश शिवदे आदीसह विदयार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १० जानेवारी २०२५


# कन्नड मध्ये राजकीय भुकंप उबाठा, आम आदमी ला खिंडार





**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड तालुक्यात राजकीय भुकंप आला असून उबाठा, आम आदमी पक्षाच्या शेकडो कार्यकर्यांनी शिवसेना प्रमुख, उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खा.संदिपान भुमरे, आमदार संजनाताई जाधव जिल्हाध्यक्ष भरतसिंग राजपूत यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. ०९ जानेवारी रोजी शिवसेनेत प्रवेश केला आहे. शिवसेना आनंद दिघे आश्रम ठाणे मुंबई येथे हा प्रवेश सोहळा संपन्न झाला.

यामुळे आ.संजनाताई जाधव यांच्या सह शिवसेनेची मोठी ताकद तालुक्यात निर्माण झाली आहे. आगामी नगर परिषद, जि.प. पं.समिती निवडणुकां जवळ आल्याने तालुक्यातील मतकारण शिवसेने चे पारडे जड पडणार असल्याचे चित्र आहे. शिवसेनेत पक्षप्रवेश केलेले विविध पक्ष, आघाडीतील कार्यकर्ते पुढील प्रमाणे सुभाष निकम आम आदमी पार्टी जिल्हाध्यक्ष, कन्नड तालुकाध्यक्ष विनायक अकोलकर, उपाध्यक्ष अण्णासाहेब गावंडे, नाना वाघ, शहराध्यक्ष रईस पवार, युवाध्यक्ष अतुल निकम, विजय ढोणे, यांनी तर उबाठा चे शहराध्यक्ष डॉ. सदाशिव पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार उबाठा चे अवचित नाना वळवळे उपजिल्हाप्रमुख, अशोकराव दाबके मा. सभापती व सरपंच अंधानेर, डॉ. सदाशिव पाटील शिवसेना शहर प्रमुख व माजी उपनगराध्यक्ष नगरपरिषद, शिवाजी थेटे उप तालुका प्रमुख, ज्ञानेश्वर वेताळ उप जिल्हा संघटक शेतकरी आघाडी, शामराव राठोड मा.तालुका प्रमुख यांसह संजय शिंदे, चंद्रकांत लाडे, सचिन काळे, सलमान शेख, लक्ष्मीकांत सुरे, विभाग प्रमुख प्रकाश काचोळे, किसन भालेराव विभाग प्रमुख, उदय सोनवणे, सागर सोनवणे, किशोर पंडित. संगीता पाटील उप शहर संघटक महिला आघाडी, संगीता सावंत उप शहर संघटक महिला आघाडी, अनिता लाडे उप शहर संघटक शहर संघटक महिला आघाडी, श्री राम भाऊ शिंदे मा. उपसरपंच भरंबा, उपविभाग प्रमुख, साईनाथ वेताळ उप तालुका प्रमुख तथा माजी नगरसेवक संभाजी नगर महानगरपालिका, प्रकाश चौधरी रिक्षा सेना शहर संघटक, राजू बेला राठोड उप तालुकाप्रमुख, राजीव गोलाईत, काकासाहेब कवडे मा. सरपंच मुंडवाडी, गुलाबराव सोळुंके उपविभाग प्रमुख, रामराव राठोड शाखाप्रमुख तेलवाडी, राजीव भिसे गंगाधर खेळवणे, लक्ष्मण गवळी, त्रिंबक आमले, विश्वास बापू मनगटे, ज्ञानेश्वर मोहिते, राजीव कदम, रघुनाथ कातवरे मा. पंचायत समिती सदस्य, रमेश राठोड फौजी वडनेर,संदेश पवार, संतोष बनकर, किरण राठोड, विकास बनकर, अक्षय केवट, रितेश शिरसाठ, विशाल खरात, गणेश घुगे, तसेच पिशोर नाचनवेल भागातून मोठ्या संख्येत प्रवेश केला आहे.

# राष्ट्रीय युवक दिन निमित्त शिवाजी महाविद्यालयात रक्त तपासणी



**कन्नड (अरुण थोरात):** राष्ट्रीय युवक दिन निमित्त शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय कन्नड येथे रेड रिबन क्लब, प्राणीशास्त्र विभाग महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी व जिल्हा एड्स प्रतिबंध पथक जिल्हा रूग्णालय औरंगाबाद तसेच ग्रामीण रुग्णालय कन्नड तर्फे एड्स जनजागृती निमित्त रक्त गट तपासणी शिबीर व पोस्टरप्रदर्शन दि. ०९ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आले होते त्यानिमित्त प्रियदर्शिनी मुलींचे वसतिगृहाच्या विद्यार्थिनीं तसेच शिवाजी कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय कन्नड रेड रिबन क्लब, विद्यार्थ्यांनी रक्त तपासणी शिबीर मध्ये सहभाग घेतला.

या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.एन. भोसले ह्यानी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यामधे आरोग्य आहार विषयक मार्गदर्शन करण्यात आले तसेच आरोग्याचे आणि युवकांचा राष्ट्र निर्माण मधे सहभाग ह्याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच वसतिगृह विद्यार्थ्यीनीना आरोग्य योग्य आहार, व्यायाम याचे महत्त्व तसेच विद्यार्थिनीचे आरोग्य याचे मार्गदर्शन केले. या प्रसंगी एड्स जनजागृतीपर पोस्टर प्रदर्शन आयोज


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


# वाचन संकल्पना अभियानांर्गत जेईएस महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन व विविध स्पर्धांचे आयोजन







**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे)** जेईएस महाविद्यालय जालना येथे महाराष्ट्र शासनाच्या 'वाचन संकल्प अभियानांतर्गत' ग्रंथ प्रदर्शन व विविध स्पर्धा तसेच उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर च्या अधिष्ठाता श्रीमती वैशाली खोपर्डे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून व्हीएसएस महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ.प्रसाद मदन तसेच दानकुवर महाविद्यालयाच्या प्रशासकीय अधिकारी प्रा. डॉ. विद्या पटवारी होत्या, कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री होते. यावेळी ग्रंथालय चळवळीचे जनक डॉ. एस रंगनाथन यांच्या प्रतिमेला पुष्पहार प्रमुख पाहुण्यांचे असते घालण्यात आला.

यावेळी ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटक म्हणून बोलताना प्रा. डॉ. वैशाली खोपर्डे हणाल्या की, ग्रंथ हेच खरे गुरु असून मानवी जीवनाला आकार देण्याचे ते कार्य करतात. ग्रंथाचे महत्व विद्यार्थ्यांसाठी खुप महत्त्वाची आहे ग्रंथामुळे मानवी जीवन सुखकर व प्रेरणादायी होते.

यावेळी प्रमुख अतिथी प्रा. डॉ. विद्या पटवारी व प्राचार्य डॉ. प्रसाद मदन यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. प्रमुख मान्यवरांच्या हस्ते जेईएस महाविद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख प्रा. डॉ.हेमंत वर्मा लिखित 'हेल्थ अँड वेल्थ' ( हिंदी) व 'नो युवर गेम क्रिकेट' (इंग्रजी )या पुस्तकांचे प्रकाशनही करण्यात आले.या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री म्हणाले की, ग्रंथामुळे मानवी जीवन सुखी व समृद्ध होते, ग्रंथ वाचनामुळे जीवनावर अनेक संस्कार घडतात. विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त वाचन करावे, आणि आपले जीवन घडवावे. असेही डॉ. अग्निहोत्री यांनी सांगितले.

वाचन संकल्प अभियानांतर्गत विद्यार्थ्यांसाठी जेईएस महाविद्यालयामध्ये सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, पुस्तक परीक्षण, ग्रंथ प्रदर्शन, समूहवाचन, निबंध लेखन स्पर्धा, कथाकथन स्पर्धा आदि चे आयोजन करण्यात आले होते.यावेळी पर्यवेक्षिका प्रा. करुणा वासनिक, प्रा.वर्षा झवर प्रा. दुर्गा मानधना, प्रा. कविता बागडी, प्रा.डॉ.आनंद कुलकर्णी, प्रा. डॉ.यशवंत सोनुने, डॉ. हेमंत वर्मा, प्रा. शेवाळे, डॉ सुनील इंदुरकर आदि विद्यार्थी - विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. डॉ.राजेंद्र सोनवणे यांनी तर उपस्थितांचे आभार ग्रंथपाल प्रा. डॉ. मनीषा सुतार यांनी व्यक्त केलेत. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ग्रंथालयातील ग्रंथालय- परिचर व सेवकांनी विशेष परिश्रम घेतलेत

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १० जानेवारी २०२५

# वृक्ष संवर्धन वसा घेतलेल्या डॉ. संतोष पाटील यांनी लावली दहा हजार झाडे




**कन्नड (अरुण थोरात):** अजिंठा डोंगर हा दांडकारण्याचा भाग होता. खुप घनदाट अरण्य या भागात, मात्र मानवी अतिक्रमण, वाढते नागरिकी करण, बेसुमार वृक्ष तोड, वनवा, तस्करी मानवी हव्यास यामुळे हा सातमाळ अर्थात अजिंठा डोंगर बोडका करण्याचा घाट अनेक वर्षांपासून सुरु आहे.

अनेक जखमा घेवून टाहो फोडणारा निसर्ग,इथली माती, झाडे, वन्यजीव, पक्षी,वृक्षांच्या पानातून अन मनातून येणाऱ्या वेदनामय आवाजाची साद ऐकली एका माणसाच्या डॉक्टरने आणी त्याच्यात लपलेल्या पर्यावरण प्रेमीने. जागतिक तापमान वाढ, सर्वत्र होणारी बेसूमार वृक्ष तोड,पर्यावरणाचा ऱ्हास, अजिंठा डोंगरातील वन्यजीवांची तस्करी, नामशेष होत जाणाऱ्या वनस्पती व जैवविविधतेतील दुवे याकडे जगाचे लक्ष वेधून त्यांच्या संवर्धनासाठी अहोरात्र परिश्रम घेणारे एक नाव म्हणजे छ. संभाजी नगर जिल्ह्यातील सिल्लोड येथील अभिनव प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. संतोष पाटील.

आपला स्वतःचा वैद्यकीय व्यवसाय सांभाळत रोज ३ तास वृक्षारोपण, निसर्ग सेवा,वृक्ष संवर्धन, जखमी पक्षी व वन्यजीवांना वाचविणे यासाठी जीवन अर्पण केलेले हे व्यक्तिमत्व. भारतीय संस्कृती व वृक्ष यांचे एक नाते आहे. विविध सणवार यात एकतरी देशी झाड पूजनीय असते. हाच धागा पकडून डॉ. संतोष पाटील यांनी वृक्षारोपण व संस्कृती यांची सांगड घालत हरितवारी हा उपक्रम संपूर्ण राज्यभर राबवत ५०० हुन अधिक झाडे या एकाच वर्षात लावून वाढविली. हरितवारीची राज्यभर चर्चा ही झाली. वारकरी संप्रदायात महत्व असलेल्या कान्होपात्रा वेल, संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या शी संबंधित सुवर्ण पिंपळ, अजानवृक्ष तुकोबाराय यांच्या जीवनात महत्व असलेला नांद्रुक, भगवान शंकर यांच्या शी संबंधित शमी, बेल, नागकेशर, भगवान श्रीकृष्ण यांसी संबंधित कदंब,भगवान रामासी संबंधित सीतापत्र,हिंदू संस्कृतीत पूजनीय असलेले वड, उंबर, पिंपळ, निम, आदी जैववीवीधता उपयोगी १० हजार झाडे १४वर्षात या अवलिया हरित वारकऱ्याने विविध मंदिर, शाळा, कॉलेज, शेत कऱ्यांच्या बांधावर, रस्त्याच्या बाजूला, विविध गावात लावून, त्यांचे पालकत्व देवून जगवली व वाढवली आहेत.

सिल्लोड तालुक्यातील बहुली हे गाव आरोग्य सेवेसाठी आधी दत्तक घेतले मग त्या गावास निसर्ग रक्षणासाठी प्रेरीत करून राज्यातील इको विलेज - पर्यावरण गाव बनविण्यास १० वर्षांपूर्वी सुरुवात केली. त्याची परिनीती म्हणजे या गावात महाराष्ट्र राज्याचे राज्यपुष्प असलेल्या जारूळ - तामन या वृक्षाचे २०० झाडे शेतकऱ्यांच्या बांधावर दिमाखात वाढत आहेत. एक हजार झाडांचा घनवन प्रकल्प बहुलीत खेळणेच्या काठी उभा आहे.

हा बहुली चा ऑक्सिजन प्लांट आहे. या सोबत बहुलीत भिकन सोनने या शेत कऱ्याच्या बांधावर दुर्मिळ देशी ४० झाडांचा जैवविविधता प्रकल्प साकारला आहे. बहुलीत लेकीचे झाडं हा उपक्रम अभिनव उपक्रम सुरु आहे.मुलीचे जेव्हा लग्न होते तेव्हा तिची आठवन म्हणून एक "लेकीचे झाड" लावले जाते व आई वडील त्या झाडास मुलगी म्हणून वाढवतात. सिल्लोड शहरातील दत्त मंदिर आश्रमातही दुर्मिळ झाडे लावण्यात आली आहेत. ही दुर्मिळ वृक्ष जतनाची, रोपणाची किमया पाटील यांनी साकार केली आहे बीज संकलनातून. डॉ. पाटील यांनी सहयाद्री, सातपुडा आणी अजिंठा डोंगर कित्येकदा पायी भटकले आहेत.

ते विविध वनस्पती, झाडांच्या बिया जमा करण्यासाठी. झाडांचे, वेलिंचे बीज जमा करणे व स्वतः रोपे बनवून ती विविध ठिकाणी, विविध निमित्ताने ती लावून, संबंधितांना त्याच्या संगोपणाचे पालकत्व देवून ती जगविणे, वाढविणे हे फलीत म्हणूनच साध्य होत आहे.शासनाने १०० वर्ष वयाच्या पुरातन झाडांना वारसा वृक्ष - हेरिटेज ट्रि हा दर्जा देण्याचे धोरण संमत केले आहे.

सिल्लोड तालुक्यातील चिंचवण येथे मुळ १० एकर अफाट आकाराचा ४०० वर्षे पुरातन शिवकालीन वट वृक्ष आहे. हा वृक्ष आता मानवी अतिक्रमण यामुळे केवळ २ एकर जमिनीवर उरला आहे. हा वृक्ष राज्य वारसा वृक्ष घोषित व्हावा म्हणून डॉ. पाटील यांनी सरकार कडे पाठपुरावा केला आहे व नुकतेच त्यासाठी वन विभागाची कमिटी येऊन सर्वेक्षण करून गेली आहे. या ४०० वर्ष पुरातन वडाच्या झाडाला वाचविण्यासाठी सर्व उपाय पाटील यांनी केले असून त्यास यश ही आले असून अशा १० पुरातन झाडांचा प्रस्ताव त्यांनी सरकारच्या राज्य वारसा वृक्ष समिती कडे सादर केले आहे.

छ. संभाजी नगर जिल्ह्याच्या उत्तरेस असणाऱ्या अजिंठा डोंगरात मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर वृक्ष तोड होते.सोयगाव, सिल्लोड च्या सीमेवर डोंगरालगत २० ते २५ अनधिकृत वीट भट्ट्या आहेत. त्यांना लागून च असलेल्या डोंगरातून देशी प्रजातीची झाडे भट्टी साठी उपलब्ध होतात.आपण एक झाड लावून मोठे व्हायला १० वर्षे लागतात मात्र हे लोकं क्षणात मोठे झाड भस्मसात करून निसर्गाची अ परिमित हानी करतात हे जाणून पाटील यांनी यावर आवाज उठवून बऱ्याच अंशी ही वृक्षतोड थांबवून या डोंगरातील हजारो झाडे वाचवली आहेत.

आपल्या अनेक मित्रांचा वाढ़ दिवस हा झाडं दिवस म्हणून साजरा करत, त्या निणीत्ताने हजार हुन अधिक झाडे लावून जगविली आहेत. रोज किमान एकतरी झाडं लावणे हा राबता सतत १४ वर्षांपासून सुरु आहे. विविध वनस्पती व फुलपाखरे व त्यांचा अधिवास हे नाते आहे. फुलपाखरांना उपयोगी होस्ट प्लांट व नेक्टर प्लांट यांचे ही शेकडो झाडे शाळा - कॉलेज या ठिकाणी लावली गेली आहेत. शहरातील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयास माणिक वन नामक बोटानीकल गार्डन हे डॉ. पाटील यांनी स्व खर्चाने, स्वतः रोपे बनवून निर्माण केले असून उच्च शिक्षित विद्यार्थी यांना ते मौलिक मार्गदर्शक ठरत आहे.

अनेक दुर्मिळ प्रजाती त्यांनी शोधून काढल्या आहेत.विविध वनस्पतींचे औषधी गुणधर्म जगास परिचित करून देवून रिसर्च पेपर ही लिहिले आहेत. अनेक शाळा - कॉलेज, गावकरी यांना वृक्ष संवर्धन हेतू व्याख्याने ही दिली आहेत. अजिंठा वनक्षेत्रातून जाणाऱ्या सावळदबारा रस्त्यासाठी ५ हजार मोठ्या झाडांना वाचविण्यासाठी तोंडापूर, गोद्री, हळदा, येथील युवकांना या भागाचे वाळवंट होनु नये. म्हणून झाडांना मिठी मारत "चिपको आंदोलन" करून हे ५ हजार झाडे वाचविली. राजस्थानातील खेजडी म्हणजेच शमीच्या झाडांसाठी अमृत देवी बिष्णोई यांनी बलिदान दिले त्या खेजडी म्हणजेच शमी चे अनेक रोपे त्यांनी विविध ठिकाणी लावून, नागरिकांना भेट पण दिली आहेत.

किर्लोस्कर वसुंधरा गौरव पुरस्कार, मराठावाडा भूषण, आदी सारख्या अनेक पुरस्कारांनी हा हरीत सेवक सन्मानित झाला आहे.राज्य शासनाच्या वनविभागाच्या मानव - वन्यजीव संघर्ष समितीवर ते स्वीकृत सदस्य म्हणून सेवा देत आहेत.प्रत्येक गावात आपल्या सारखे शेकडो निसर्गदूत निर्माण करत, शाळा कॉलेजात हरित सेनानी निर्माण करून हा वृक्ष वारसा जतन करत आहेत.